**दिनांक : १ - ७ - २६**
**विषय : काही महत्वाच्या सूचना.**

सभासद बंधू भगिनींनो,

कृपया लक्षात घ्या की जून महिन्यात आलेल्या पत्रकार नगर च्या रहिवाशांचे वीज बिलं सभासदांनी स्वतः भरायची आहेत. जे सभासद वीज बिलं Auto payment प्रकारे भरतात त्यांनी ही सुविधा बंद करायला हवी.

सभासदांकडे पोस्टा ने येणाऱ्या कागद पत्रांसाठी, पुढील ३ - ४ दिवसात, बिल्डर च्या  शेड जवळ एक मोठा बॉक्स ठेवण्यात येणार आहे ज्यात पोस्टमन सर्व टपाल टाकेल जिथून सभासदांना ती घेता येतील. महत्वपूर्ण टपाला साठी सभासदांनी मॉडेल कॉलनी च्या पोस्टात जाऊन त्यांच्या राहण्याचा नवीन पत्ता देऊन त्यांचे टपाल नवीन पत्त्यावर मिळेल अशी व्यवस्था करून घ्यावी.
सध्या सोसायटी ची सुरक्षा व्यवस्था कॉलनीत उपलब्ध आहे तसेच अजून ज्या सभासदांनी त्याचं घरं रिकामी केलेली नाही त्यांच्या इमारतींमध्ये वीज आणि पाण्या ची सोय ही चालू ठेवण्यात आली आहे मात्र झाडलोट, ओला कचरा गोळा करणे सारख्या सोई कमी करण्यात आल्या आहेत.
बिल्डर कडून सोसायटी च्या चारीकडे पत्रे लावण्याचे काम आज पासून सुरू करण्यात आले आहे. ह्या कामा साठी बिल्डर च्या  कॉन्ट्रॅक्टर चे कामगार सोसायटीच्या आवारात असतील. त्यांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत की त्यांच्या मुळे तिथे राहणाऱ्या सभासदांना कुठलाही प्रकार चा त्रास होता कामा नये.

धन्यवाद

पंच समितीच्या वतीने